# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३१/०१/२०१८

**१) विवाहितेचा शारिरीक व मानसिक छळ करुन विटेनी मारुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ३०/०१/२०१८ चे ०८.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हिला तिचा पती आरोपी याने तिचे चारीत्र्यावर संशय घेवुन तिच्याशी भांडण करुन तिचा शारिरीक व मानसिक छळ करुन फिर्यादीचे डोक्यावर विटेनी मारुन आपखुशीने दुखापत केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ४९८(अ), ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोना. चाचेरे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**२) बेकायदेशीर रित्या लोखंडी तलवार हातात घेवुन मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २९/०१/२०१८ चे २३.५० वाजता. दरम्यान यातील आरोपी हा सार्वजनीक ठिकाणी बेकायदेशिर रित्या एक लोखंडी तलवार किंमती ५००/—रु. ची हातात घेवुन फिर्यादीस मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनि. काळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३/२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोगे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) हुंडयाची मागणी करुन मानसिक त्रास दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २२/१२/२०१७ चे १८.३० ते १५.०० वाजता. दरम्यान यातील आरोपीने फियादी सोबत साक्षंगधाचा कार्यक्रम करुन दिनांक २२/१२/२०१७ ला सायकांळी फोन व्द्रारे म्हणला की तुझी उंची कमी आहे. तुझ्या सोबत लग्न करीन परंतु तुझी आई मला ५ ग्रॅम, सोन्याचा गोप, व गाडी देईल तेव्हाच मी लग्न करीन? अशा प्रकारे प्रत्यक्षरित्या हुंडयाची मागणी करुन मानसिक त्रास दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३,४ हुंडा प्रतिबंधक अधि. १९६१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बहादुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे दोन जखमी . :—**

दिनांक २९/०१/२०१८ चे ०६.१५ वाजता. दरम्यान यातील फिर्यादी दुर्गेश बालचंद ठाकुर वय २५ वर्ष, रा. गर्रा बघेडा हा डिजेल संपल्यामुळे रोडचे डावे बाजुला खाली ऊभा केलेला ट्रॅक्टर क्र. एम. एच. ३५ जी. ३१८७ ला विरुध्द बाजुने येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मिटेवानी जवळ मुख्य रस्त्याच्या बाजुला सुलपावर येथे धडक दिल्याने मोटार सायकल चालक स्वत: व मागे बसलेला मानसाने तुळशीदास उपरकर यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चिचखेडे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

५) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :—

दिनांक ३०/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, कारधा, तुमसर, सिहोरा व गोबरवाही येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ९८ लिटर हातभट्टी दारू किंमती ८३००/—रु, चा माल जप्त करण्यात आला.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ३०/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२, तीन सिटर वाहनाकरीता ०७, ईतर वाहनांवरती — ६७ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.